## प्रेसनोट दि.१९/०३/२०१९

## एक गांव एक शिवजयंती कार्यक्रमा बाबत.

## कोंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर

कोंढवा पोलीस ठाणे च्या हद्दीत साजरा होणा-या शिवजयंती उत्सवा निमित्त कोंढवा पोलीस ठाणेच्या वतीने परिसरातील मंडळांची कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मिटींग आयोजित करण्यात आली होती यावेळी कोंढवा बुद्रूक गांवातील एकण २५ मंडळांनी एकत्र मिरवणूक काढण्यात येणार असल्याचे सांगीतले. यावर कोंढवा बुद्रूक गांवचा सर्वानी आदर्श घ्यावा असे विधान यावेळी कार्यकत्यांना सुचना देताना कोंढवा पोलीस ठाणे चे पोलीस निरीक्षक महादेव कुंभार यांनी केले.

यावेळी कार्यकत्यांना संबोधीत करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अनिल पाटील, श्री कुंभार हे म्हणाले की, निवडणूकीची आचारसंहिता चालू आहे. त्यामुळे आदर्श आचार संहितेचे पालन सर्वांनी करावे. डी.जे. तसेच मिक्सरला परवानगी नाही. त्यामुळे डी जे कोणी लावू नये. कायदयाच्या चौकटीत राहून उत्सव साजरा करावा. मिरवणूकीच्या वेळी स्वयंसेवकांची नेमणूक करावी अशा सुचना यावेळी केल्या . तसेच कोंढवा वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. चंद्रकांत निंबाळकर यांनी वाहतूक विभागा अंतर्गत येणारे वाहतूकीचे परवानगीच्या बाबतीत मार्गदर्शन केले आहे.

सदर शिवजयंती उत्सव मिटींगचे वेळी स्थानिक कार्यकर्ते महेश कांमठे, श्रीकांत पवार, राहूल कामठे , मयूर काटे, संभाजी कामठे सुखदेव कामठे, तसेच शांतता कमिटी व मोहल्ला कमिटीचे सदस्य गणेश शिंदे, सलीम शेख, सत्तार शेख,तसेच कोंढवा पोलीस ठाण्याचे कर्मचारी कुमार गायकवाड, आनंद धनगर, राहूल माने आदि उपस्थित होते. त्यावेळी समस्थ कोंढवा बुद्रुक ग्रामस्थ एकत्र येऊन एकच शिवजयंती उत्सव साजरा करण्याची वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अनिल पाटील यांना ग्वाही दिली.

**(अनिल पाटील)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**कोंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर**